# शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपलिका
# कै. भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना
# जाहिर निविदा क्र. 33

शिक्षण मंडळ पुणे महानगरपलिका यांचेकडून खालील तपशीलात नमुद केलेल्या बाबींसाठी दोन लिफाफे (Two Bid System) पध्दतीने सिलबंद निविदा सक्षम संस्था, व्यक्ती, कंपनी यांचेकडून मागविण्यात येत आहेत. निविदा अर्जासोबत निविदा अटी व इतंर सविस्तर माहिती वरील पत्यावर समक्ष मिळेल, पोष्टाने माहिती पाठविली जाणार नाही व पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

**1.कोरे निविदा प्रपत्र विक्री –** निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून बुधवार दिनांक 02/02/2011 पासून गुरुवार दिनांक 17/02/2011 पर्यंत कार्यालयीन वेळेत फक्त षिक्षण मंडळ कार्यालयात मिळेल.

**2. निविदा व बयाणा स्विकृतीची तारीख व वेळ –** निविदा सूचना प्रसिध्द झाल्यापासून शुक्रवार दिनांक 18/02/2011 रोजी दुपारी 1.00 वाजे पर्यंत

**3. निविदा उघडण्याची वेळ** शुक्रवार दिनांक 18/02/2011 दुपारी 3.00 वाजता किंवा कार्यालयीन सोयीनुसार निविदा भरणाऱ्यांच्या किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

**4. निविदा दर** सर्व करांसह व वाहतुकींसह देणे आवष्यक आहे.

**5** शिक्षण मंडळ, पुणे मनपाचे करिता शैक्षणिक वर्ष 2010–11 अखेर खरेदी करावयाच्या बाबी व त्याचा तपषिल

| क. | तपशील | अंदाजे नग | तरतूद | फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | शिपाई गणवेश | पुरुष – 1078<br>स्त्रिया – 210 | 8 लक्ष | 2000/– |
| 2 | बालवाडी साहित्य | 300 | 1 लक्ष | 750/– |

## सूचना

1. निविदा भरताना बयाणा रक्कम शेकडा 1 टक्का व निविदा मान्य झाल्यावर शेकडा पाच टक्के अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. निविदा फॉर्म सोबत अटी, स्पेसिफिकेशन, निश्चित केलेली बयाणा रक्कम कार्यालयात भरून मुदतीत निविदा घेऊन ती मुदतीत भरून देणे आवश्यक आहे.
2. कोणतीही निविदा स्विकारणे व नाकारणे हा मा. शिक्षण मंडळाचा अधिकार आहे व राहील.
3. सदर निविदा त्या संबंधीची सर्व माहिती पुणे मनपाच्या वेबसाईट **www.punecorporation.org** वर पाहण्यासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहे व शिक्षण मंडळाचे नोटीस बोर्डवरही प्रसिध्द केली आहे.

**स्वाक्षरी/–**
**अध्यक्ष**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा**

**स्वाक्षरी/–**
**शिक्षण प्रमुख,**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा**

**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**
**स्पेसिफिकेशन सन 2010 – 11**
**निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक ––/––/2011**
**दुपारी 1.00 वाजेपर्यंत**
**शिपाई गणवेश पुरविणेबाबत**
**बयाणा रक्कम रूपये 8,000/–**

**1. शिपाई गणवेश – पुरुषांचे अंदाजे नग संख्या 1078**

अ. कार्यालयीन शिपाई, सेवक – पांढरा गणवेश – अंदाजे नग संख्या – 44

ब. शाळा शिपाई व रखवालदार – खाकी गणवेश – अंदाजे नग संख्या – 1034

फुल पॅन्ट, फुल शर्ट, टोपी याकरिता खालील मिलचे टेरीकॉट कापड वापरावे. एम. एस. टी. सी. मिल पॉलिस्टर, 67 टक्के, Viacase (व्हायाकेस) 33 टक्के ब्रॅण्डेड मिलचे कापड

सदरचे गणवेश शिपायांच्या मापानुसार शिवावे लागतील.

शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका हे नाव लाल दोऱ्याने खिशावर एम्ब्रॉयडरी करावी लागेल. याबाबतचा वेगळा दर दिला जाणार नाही. नगाचा कापडासह, शिलाईसह दर द्यावा. कापडाचा नमुना द्यावा. फुल पॅन्ट, फुल शर्ट, टोपी या एका गणवेशाचा दर द्यावा. शिलाईसाठी कोटस् कंपनीचा अमॅटो (थ्रेड) दोरा वापरावा. पॅन्टकरिता झीप (चैन) व हुक चांगल्या प्रतीचे वापरावेत. एका इंच शिलाईत कमीत कमी दहा ते बारा असावेत.

**2. शिपाई गणवेश – स्त्रियांचे ( 9 वार अंदाजे नग 16 व 6 वार अंदाजे नग संख्या 210)**

साडी व ब्लाऊजपीससाठी पॉलीस्टर स्पन बाय स्पन चांगल्या प्रतीची निळया रंगाची व छापील डिझाईनच्या पदराची 8.20 मीटर व 5.5 मीटर (9 वार व 6 वार) रुंदी 47 इंच असणे आवश्यक आहे. टेंडरसोबत 9 वार व 6 वार साडयांचे वेगवेगळे दर देणे आवश्यक आहे. टेंडर सोबत नमुना देणे आवश्यक आहे.

ब्लाऊजपीस – पांढरे टेरीकॉट कापड – 90 से. मी. दर द्यावा. टेंडरसोबत नमुना देणे आवश्यक आहे. 3 मीटर कापडाचा तुकडा देणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| स्वाक्षरी/– | स्वाक्षरी/– |
| अध्यक्ष | शिक्षण प्रमुख, |
| शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा | शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा |

## शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
## शिवाजीनगर, पुणे 411005
## शिपाई गणवेश पुरविणेकामी निविदा अटी व शर्ती
## सन 2010–11.

दैनिक पुण्यनगरी, व दैनिक केसरी दिनांक 3 फेब्रुवारी, 2011 मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा सुचना क्र. 33/भांडार अनुसरुन शिपाई गणवेश पुरविणेकरिता सदर निविदा भरत आहे.

1. निविदा सीलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निविदा आली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.
2. निविदा भरताना खालील अट क्र. 12 नुसार कागदपत्रांचा लिफाफा एक व दरपत्रकाचा एक लिफाफा असावा. पाकिटावरील कोपऱ्यात ''तांत्रिक निविदेचा लिफाफा'' असा स्पष्ट उल्लेख असावा.
3. निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. शिपाई गणवेशाचा दर अंकी व अक्षरी लिहावेत.
4. विक्रीकर व इतर सर्व कर धरुन निविदामधील दरपत्रक भरण्यात यावे. शिपाई गणवेश पुरविण्याचे कामी भरावी लागणारी जकात निविदादारालाच भरावी लागेल.
5. कोणतीही निविदा स्विकारण्याचा वा नाकारण्याचा अधिकार हा मा. शिक्षण मंडळास आहे.
6. निविदा पुर्ण अगर अशंतः मंजुर करण्याचा अधिकारही मा. शिक्षण मंडळास आहे.
7. निविदाकरीता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत, संख्येत बदल करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळाचा आहे, याबाबत निविदादारास तक्रार करता येणार नाही.
8. ज्याची निविदा मंजूर होईल त्यास विहित नमुन्यातील जाहिर सुचनेतील व सदर निविदा अटीस अधिन राहून करारनामा स्वखर्चाने करुन द्यावा लागेल.
9. शासन किंवा शासन (अंगिकृत) संस्था निविदा भरत असेल तर त्यांना त्यासंबधी योग्य तो पुरावा निविदेबरोबर द्यावा लागेल.
10. निविदा भरणाऱ्यांनी निविदा भरताना शेकडा 1 टक्का याप्रमाणे बयाणा रक्कम रोख अथवा डी. डी. ने भरली पाहिजे. सदरची रक्कम न भरल्यास निविदेचा विचार कोणत्याही परिस्थितीत केला जाणार नाही. निविदादाराला नियमानुसार जर बयाणा रक्कम व अनामत रक्कमेच्या बाबत शासकीय नियमित सूट हवी असल्यास, त्याने शासन अंगीकृत एस. एस. आय. युनिटचा व कायम स्वरुपी नोंदणी दाखला जोडणे आवश्यक आहे.
11. 2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयानुसार (परिशिष्ट 12) संबधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निविदादारास बयाणा रक्कम व अनामत रक्कमेमध्ये सुट मिळेल. अन्यथा त्याला एस. एस. आय. युनिट असे असेल तरी वरील रक्कमा भराव्या लागतील.

12. निविदेसोबत लिफाफा एक मध्ये फर्म / कंपनी यांचे नावे टेंडर भरल्यास त्यातील मालकाचे / भागीदारांचे नावे, पत्ते देण्यात यावेत. तसेच ती संस्था शासन किंवा शासन (अंगीकृत) असेल त्यांनी त्यासंबधी पुरावा देणे आवश्यक आहे. निविदादाराने संस्थेचा नोंदणी दाखला, इन्कमटॅक्स रिटर्न प्रत, व्हॅट क्लिअरन्स सर्टीफिकेट दि. 31 मार्च ------ पर्यंत या संपलेल्या हिशोबी वर्षाअखेरचे असले पाहिजे. संबधित प्रती एस. इ. ओ. कडून ॲटेस्टेड असाव्यात. व्यवसायकर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक आहे. तेथे अधिकृत विक्रेता अशी अट आहे, तिथे त्यांनी तसे प्रमाणपत्र निविदा लिफाफा 1 मध्ये जोडणे आवश्यक आहे, तसेच उत्पादकांसाठी मशीन शेडयुल अद्ययावत उद्योगधंदा परवाना तसेच त्या कामाची निविदा भरलेली असेल त्याबाबत स्वतःच्या कारखान्यातील मशिनरीचा तपशील मशीन शेडयूलमध्ये देणे आवश्यक आहे. मशिनरी पाहणी करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहील. आर्थिक क्षमता असल्याचे बॅंकेचे अद्ययावत प्रमाणपत्र (निविदा रक्कमेच्या 25 टक्के) इ. आवश्यक बाबींची पुर्तता असल्याशिवाय पाकीट क्र. 02 उघडले जाणार नाही. वरिल सर्व कागदपत्रांच्या सर्व मुळ प्रती निविदा उघडण्याच्या दिवशी कार्यालयात सादर कराव्या लागतील. नंतर सादर करण्याची संधी दिली जाणार नाही.
13. टेंडर फॉर्ममध्ये त्या शिपाई गणवेशाचा दर भरण्यात आलेला आहे. त्याचा नमुना निविदादाराने स्वखर्चाने निविदेसोबत द्यावयाचा आहे. सदर नमुना खरेदी करावयाची जबबादारी किंवा त्याकामी असलेल्या खर्च देण्याची जबाबदारी मा. शिक्षण मंडळावर नाही. नमुना दिल्याशिवाय निविदा स्विकारता येणार नाही.
14. कोणत्याही परिस्थितीत अटींची (कंडीशनल) निविदा विचारात घेतली जाणार नाही.
15. निविदा मंडळाने दिलेल्या अटींना व शर्तींना अनुसरुन न आल्यास ती पुर्णतः नाकारण्यात येईल.
16. बयाणा व अनामत रक्कम या पुर्णपर्ण एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रक्कमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.
17. शिपाई गणवेश पुरविण्याकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची राहील. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहील.
18. दिलेल्या मुदतीत शिपाई गणवेश न पुरविल्यास अनामत रक्कम जप्त केली जाईल. व त्याच्या खर्चास व परिणामास संबधितास जबाबदार धरले जाईल.
19. दिलेले किंवा पुरविलेले शिपाई गणवेश मा. शिक्षण मंडळ कळविल त्याठिकाणी स्वखर्चाने पोहोचविण्याची जबाबदारी निविदादारावर राहिल.
20. दिलेल्या नमुन्याप्रमाणे शिपाई गणवेश न आल्यास शिपाई गणवेश स्विकारले जाणार नाही. न स्विकारलेले शिपाई गणवेश 10 दिवसांच्या आत स्वखर्चाने संबधित निविदादाराने त्या ठिकाणापासून नेले पाहिजे ते न नेल्यास त्यास दररोज रु. 1,000/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) प्रमाणे जादा भाडे आकारले जाईल. व 30 दिवसांपेक्षा जास्त दिवस झाल्यास त्यामालाची जबाबदारी मा. शिक्षण मंडळावर राहणार नाही.

21. पुरविलेले गणवेश सर्व नग मोजून, तपासून घेऊन दिलेल्या नमुन्याप्रमाणे सर्व शिपाई गणवेश असल्याची खात्री मा. शिक्षण मंडळास झाल्याशिवाय बिल मिळणार नाही. कोणत्याही स्वरुपात हप्त्याचे आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करण्याचा हक्क राहणार नाही.

22. टेंडर्सचे युनिटला करानामा करण्यापुर्वी आवश्यकतेनुसार मा. शिक्षण मंडळ भेट देईल त्याकामी निविदादाराने सर्व सहाकार्य केले पाहिजे. टेंडर्सचे स्वतःचे युनिट कोठेही नसल्यास निविदा नाकरण्याचा पुर्ण अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे.

23. एकदा भरलेली निविदा रद्द करता येणार नाही. एखाद्याला ती जर रद्द करावयाची असेल तर, त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहिल. तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक वसूल करण्यात येईल.

24. मा. शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजूर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत मिळेल. त्यापुर्वी कोणासही बयाणा रक्कम मागण्याचा अधिकार असणार नाही. बयाणा रक्कम घेताना बयाणा रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

25. निविदादाराने शिपाई गणवेश पुरविण्याची करारनाम्याची शेवटची मुदत असेल, त्या दिवसाच्या आगोदर 8 दिवस शिपाई गणवेश तयार झालेले असून त्यासंबधी पाहणीसाठी शिक्षण मंडळास पत्र देणे आवश्यक आहे.

26. शिपाई गणवेश पुरविण्याबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो फक्त पुणे येथील कोर्टाचाच विषय असेल.

27. निविदा एकास, अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे.

28. शिपाई गणवेश सांगितलेल्या ठिकाणी पुरविल्यानंतर त्याची मा. शिक्षण मंडळाकडून पाहणी करण्यात येईल. शिपाई गणवेश विहीत नमुन्यात आहे किंवा नाही हे ही पाहिले जाईल. खराब किंवा स्पेसिफिकेशनप्रमाणे नसल्याचे शिपाई गणवेश आढळून आल्यास संपूर्ण किंवा अंशतः शिपाई गणवेश नाकारण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळाला आहे.

29. सदर निविदाबाबत किंवा त्यातील अटींबाबत, करारनाम्याबाबत, बीलाबाबत वाद निर्माण झाला तर तो वाद मा. शिक्षण प्रमुख, व मा. अध्यक्ष, शिक्षण मंडळ, पुणे मनपा यांचेकडे सोपविण्यात येईल. आणि ते त्यात लवाद म्हणून (आर्बिटेंटर) काम पाहतील. त्यांचा निर्णय अंतिम असेल. आणि तो उभय (दोन्ही) पक्षांवर बंधनकारक राहील. त्यातील कोणत्याही वादाचा विषय हा कोर्टाचा विषय असणार नाही.

30. मालाचा साठा झालेबरोबर त्याची प्रथम अधिकृत प्रयोगशाळेकडून तपासणी केल्यानंतरच त्यांचे वाटप करावे लागेल.

31 मंजूर केलेल्या अधिकृत नमुन्याप्रमाणे व ठरवून दिलेल्या मुदतीत मालाचा पुरवठा झालेवर पुरवठा केलेल्या मालाची एकत्रित देयके शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे मनपा यांचे नावे या कार्यालयाता सादर करावीत. शाळावार साहित्याचा पुरवठा करताना तयार केलेली चलने

संबधित शाळेच्या मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरी व शिक्यासह देयकासमवेत सादर करावीत. त्या शिवाय बिल प्रदानाबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

32. या कार्यालयात काही अपरिहार्य कारणामुळे बिलाची रक्कम अदा करण्यास विलंब झालेस विलंबाबाबत व्याज दिले जाणार नाही. अगर पुरवठा धारकास कायदेशीररित्या कारवाई करता येणार नाही.

33. पुरवठादार जर लघुउद्योजक असेल तर त्याने चालू वर्षात त्याचे रजिस्ट्रेशन चालू असलेल्याचे पत्र लघुउद्योग महामंडळाकडून घेवून ते जोडणे आवश्यक असेल अन्यथा त्याचा टेंडर फॉर्म रद्द करण्यात येईल.

**स्वाक्षरी /–**
**अध्यक्ष**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा**

**स्वाक्षरी /–**
**शिक्षण प्रमुख,**
**शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा**

# प्रतिज्ञालेख

मी,श्री.———————————————————————— वय ——— वर्ष व्यवसाय – धंदा, राहणार —————————————————————— निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,वरील निविदा फॉर्म सोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निविदा भरलेली आहे व निविदेसोबत मला अटी व शर्ती मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निवीदेसोबत दाखल करित आहे.

**पुणे**

**दिनांकः–** **पुरवठाधारकाची नाव,सही व षिक्का**

शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका
स्पेसिफिकेशन 2010–11
निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक / /2010
वेळ–दुपारी 1.00 वाजेपर्यंत
बयाणा रक्कम रूपये /–
बालवाडी साहित्य आणि खेळणी
अंदाजे शाळा – 300

| SR NO | ITEM | | |
|---|---|---|---|
| 1 | NUTSERY SLIDE | STAND IN PIPE & FIBER - 36" | **OR** |
| | | PLASTIC SLIDE - 30 " | |
| 2 | PLASTIC ROCKING HORSE | PLASTIC - 16" x 1.50 " | |
| 3 | JUMPING SPRING - TRAMPOLINE | 45" | |
| 4 | FOOTBALLS | 6" DIAMETRE | |
| 5 | SMALL BALLS | 3' DIAMETRE | |
| 6 | JIGSAW PUZZLE | IN THICK BOARD | |
| 7 | KHANJIRI | | |
| 8 | CUT OUTS | MAIN | |
| | | STORY CUTOUTS | |
| 9 | ALPHABET | ALPHABET WORD TRY | |
| | | ALPHABET TOWER | |
| | | APPLE TREE | |
| | | ALPHABET CUTOUTS | |
| | | ALPHABET PICTURE BOX | |
| 10 | TOYS FOR FINGURE EXERCISE | SEWING WORK BOARD SET OF 5 | |
| | | MASHROOM BOARD | |
| 11 | PUPPETS | | |
| 12 | FLANEL BOARD | | |
| TOTAL NO OF SETS TOTAL VALUE - A | | TOATAL COMES TO AROUND 65 LACS. MAIN PRICES ARE FOR SLIDE \ ROCKING HORSE\ JUMPING SPRING | |
| 13 | FORM BOARD | | |
| 14 | SHAPE STACKING BOARD | | |
| 15 | PAINTED PICTURES ON FESTIVAL/ PLACE OF WORSHIP | | |
| 16 | COUNTING JIGSAW | | |
| 17 | COUNTING FRAME | | |
| 18 | NUMBER FRAME | | |
| 19 | LAMINATED CHARTS | | |
| TOTAL NO OF SETS TOTAL VALUE - B | | TOATAL COMES TO AROUND 65 LACS. | |
| A + B | | IF WE TAKE A AND B TOTAL BUDGET SHOULD BE YOU CAN DELETE THE THING WHICH YOU THINK WE HAVE MADE THE LIST OF ITEMS WHICH NORMALY USE IN NUSRERY SCHOOLS | |

स्वाक्षरी/–
अध्यक्ष
शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा

स्वाक्षरी/–
शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा

**शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका**
**शिवाजी नगर, पुणे 411005.**
**बालवाडी साहित्य आणि खेळणी**
**खरेदी निविदा अटी व शर्ती 2010–11.**

**1.संदर्भ :–**

पुणे दैनिक पुण्यनगरी व दैनिक केसरी दि. 03 फेब्रुवारी, 2011 मधील प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदा क्र 33 /भांडार/विद्यार्थी/**बालवाडी साहित्य आणि खेळणी** पुणे शिक्षण मंडळामार्फत चालविल्या जाणाऱ्या मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांकरिता **बालवाडी साहित्य आणि खेळणी** पुरविण्याचे कामी विहीत नमुन्यातील निवीदा फॉर्म व निवीदा अटी खालीलप्रमाणे

शैक्षणिक वर्ष 2010–11 चे करिता खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीस अनुसरून, **बालवाडी साहित्य आणि खेळणी** विशिष्ठ मुदतीत पुरवठा करण्यासाठी निविदा मागविण्यात येत असून, त्या निवीदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे –

**अटी व शर्ती :–**

1. निविदा सिलबंद असली पाहिजे. दिलेल्या मुदतीत व वेळेत निवीदा आली नाही तर ती स्विकारली जाणार नाही.
2. निविदेसाठी दोन लिफाफा पध्द्त असुन **अ** पाकीटमध्ये खालील साक्षांकित कागदपत्रे सादर करावयाची आहेत.
3. **अ पाकीटात सादर करावयाची कागदपत्रे.**

1) निवीदा रकमेच्या शेकडा 1 टक्के या दराने बयाणा रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेचा मा. शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा, पुणे यांचे नावे काढलेल्या धनाकर्ष (डीडी) किंवा रोख भरणा कार्यालयात भरावा. 2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ट 12 अन्वये संबंधित लघुउद्योगाकडे अधिकृत पुरवठादार असल्याचे विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचे अधिकृत नोंदणी असल्याबाबतचे चालू वर्षाचे पत्र सोबत जोडले तरच निवीदादारास बयाणा रक्कम व अनामत रकमेमध्ये सुट मिळेल अन्यथा त्याला एस.एस.आय. युनिट असले तरीसुध्दा बयाणा वरील रकमा रोख भराव्या लागतील.

2) निवीदादाराचे संस्था नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र.

3) शासन, शासन अंगिकृत व इतर संस्थांना **बालवाडी साहित्य आणि खेळणी** पुरविलेबाबतची अनुभवाची कागदपत्रे किंवा प्रमाणपत्र.

4) निवीदादाराचे आयकर खात्याकडे नोंदणी केल्याचा नोंदणी प्रमाण पत्राची (पॅनकार्ड) छायांकित प्रत, तसेच मागील वर्षाचे इनकम टॅक्स रिटर्न प्रत

5) निविदादार नोंदणीकृत सहकारी संस्था, नोंदणीकृत कपंनी किंवा नोंदणीकृत भागीदारी संस्था असेल तर संबंधित नोंदणी प्रमाणपत्र कार्यालयीन संचालकांची किंवा भागीदारांची पुर्ण नावे, वय, पत्ते व संस्थेचे नोंदणीकृत दाखल्याची प्रत, संस्थेने सहीचे अधिकार दिल्याबाबतचे पत्र तसेच निवीदादार शासन किंवा शासन अंगिकृत संस्था असेल तर त्याबाबतची सर्व कागदपत्रे.

6) व्यवसायकर भरणा केलेले अद्ययावत चलनाची प्रत जोडणे आवश्यक.

7) निविदादाराची निविदा कामाची पुर्तता करणेसंबंधी आर्थिक क्षमता असल्याबाबतचे बॅकेचे प्रमाणपत्र (बॅक सॉलव्हन्सी) चालू वर्षाची निविदेच्या एकूण किमतीच्या किमान 25 टक्के रकमेचे.

8) **अ** पाकीटात सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पाकीट उघडताना शिक्षण मंडळाचे कार्यालयास तपासणीवेळी ठेकेदारांना समक्ष कामी सादर कराव्या लागतील.

4. **अ** पाकीटमध्ये आवष्यक ती कागदपत्रे नसल्यास ब पाकीट उघडण्यात येणार नाही. याबाबत खरेदी समितीचा निर्णय अतिंम राहील.

5. पाकीट **ब** मध्ये निविदा धारकाने विहित नमुन्यातील सर्व करासह दर भरावेत व दोनही पाकीटे सिलबंद करून एका मोठया पाकीटात भरून त्या पाकीटावर निवीदा धारकाचे नाव, निवीदा क्रं.नमुद करून तो सिलबंद करून सादर करावा.

6. **निवीदादाराने पुर्तता करावयाच्या अटी व शर्ती.**

1. निविदा स्वच्छ व स्पष्ट अक्षरात लिहिलेली असावी. बालवाडी साहित्य आणि खेळण्यांचे दर अंकी व अक्षरी लिहावेत.
2. निविदा स्विकारण्याचा, नाकारण्याचा पुर्ण अगर अशंतः मंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार मा. शिक्षण मंडळास राहिल.
3. निविदेकरिता मंजूर व जाहीर केलेल्या रकमेत संख्येत बदल करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे.
4. मान्य निविदाधारकास निविदा दर स्विकृती मिळाल्यापासुन 7 दिवसाच्या आत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमानुसार सर्वसाधारण मुद्रांकावर करार करणे बंधनकारक आहे. करार करण्यास निविदादाराने लेखी स्वरूपात असमर्थता दर्शविल्यास बयाणा रक्कम

जप्त करण्यात येईल. प्रसंगी शिक्षण मंडळास सदर प्रक्रियेतुन काही नुकसान झाले असल्यास तीही रक्कम संबधितांकडून वसूल करण्यात येईल.

5. मान्य निविदादारास करार करतेवेळी बालवाडी साहित्य आणि खेळणी पुरवठयाच्या एकूण किंमतीच्या 5% रक्कम सुरक्षा / अनामत रक्कम म्हणून शिक्षण मंडळाकडे धनाकर्ष (डीडी) किंवा रोखीने भरावी लागेल.

6. निवीदेतील मान्य दर फक्त आर्थिक वर्ष 2010–11 करिताच करार केल्यापासून बंधनकारक राहतील.

7. बयाणा रक्कम व अनामत रक्कम पूर्णपणे एकमेकांपासून वेगळया आहेत. सदर रकमांवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

8. बालवाडी साहित्य आणि खेळणी पुरविण्याकरिता करारनाम्यात दिलेली मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही. सदर मुदत करारनाम्याची विशेष व महत्वाची अट राहिल. मात्र विशेष परिस्थितीत दिलेली मुदत वाढविण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास राहिल.

9. दिलेल्या मुदतीत परिशिष्ठ **ब** मध्ये नमुदकेल्याप्रमाणे बालवाडी साहित्य आणि खेळणी न पुरविल्यास निविदादराची अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्रसंगी निविदादारास **ब्लॅकलिस्ट** करण्याचा अधिकार मा. शिक्षण मंडळास आहे व राहिल. वेळी व प्रसंगी नुकसान भरपाई मागणीचा अर्ज संबधित ठेकेदाराविरूध्द् लवादाकडे सादर केला जाईल व त्याच्या खर्चास व परिणामास संबंधितास जबाबदार धरले जाईल.

10. करारनाम्यानुसार पुरवठा करावयाचे बालवाडी साहित्य आणि खेळणी कार्यालयाने दिलेल्या यादीनुसार मनपा शाळांमध्ये स्वखर्चाने जकातीच्या रकमेसह पोहचविण्याची जबाबदारी निविदादारावर आहे.

11. करारनाम्यानुसार व स्पेसिफिकेशनप्रमाणे बालवाडी साहित्य आणि खेळणी न आल्यास सदरचे बालवाडी साहित्य आणि खेळणी स्विकारली जाणार नाही मुदतीत न स्विकारलेले बालवाडी साहित्य आणि खेळणी 10 दिवसांच्या आत स्वखर्चाने संबंधित निविदादाराने त्या ठिकाणापासून स्वखर्चाने नेले पाहिजे ते न नेल्यास त्यास दररोज रू. 1000/– (अक्षरी रूपये एक हजार फक्त) प्रमाणे जागा भाडे आकारले जाईल व 30 दिवसांपेक्षा जास्त दिवस झाल्यास त्या मालाची जबाबदारी मा.शिक्षण मंडळावर राहणार नाही किंबहुना शिक्षण मंडळ संबधित नाकारलेल्या मालाची विल्हेवाट मनमानेल त्याप्रमाणे करेल.

12. पुरवठा केलेले सर्व बालवाडी साहित्य आणि खेळणी मोजून, घेवून दिलेल्या स्पेसिफिकेशनप्रमाणे बालवाडी साहित्य आणि खेळणी असल्याची खात्री मा. शिक्षण मंडळास झाल्याशिवाय बिल मिळणार नाही. कोणत्याही स्वरूपात हप्त्याने आगाऊ बिल मिळणार नाही. कोणासही ॲडव्हान्स रक्कमेची मागणी करता येणार नाही तसेच देय बिलातून आयकर **कलम 194 सी नुसार टी.डी.एस.** रक्कमेची कपात केली जाईल.

13. निविदादाराचे उत्पादक युनिटला करारनामा करण्यापूर्वी आवश्यकतेनुसार मा. षिक्षण मंडळ किंवा त्यांचे अधिकृत सभासद भेट देईल त्याकामी निविदादाराने सर्व सहकार्य केले पाहिजे.

14. एकदा भरलेली निविदा रदद् करता येणार नाही एखाद्याला ती जर रदद् करावयाची असेल तर त्याची संपूर्ण बयाणा रक्कम जप्त करण्याचा अधिकार खरेदी समितीस राहिल तसेच सदरची निविदा दुसऱ्या ठेकेदारास दिल्यानंतर बिलातील येणारा जादा फरक दंड म्हणून वसूल करण्यात येईल.

15. मा. शिक्षण मंडळाने निविदेमध्ये नमुद केलेले काम मंजुर निविदादारास दिल्यानंतर इतर निविदादारांची बयाणा रक्कम चेकने परत दिली जाईल. बयाणा रक्कम भरल्याची मुळ पावती मागणी अर्जासोबत जोडणे आवष्यक आहे.

16. निविदादाराने बालवाडी साहित्य आणि खेळणी पुरविण्यास तयार झालेली आहेत त्यासंबधी पाहणी व तपासणी करण्याची विनंती शिक्षण मंडळास केली पाहिजे व तसे विनंती पत्र देणे आवश्यक आहे.

17. बालवाडी साहित्य आणि खेळणी पुरविण्याबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो करारनाम्यानुसार लवादाचा विषय असेल व उभय पक्षाला संबधित वाद निर्णयाकरिता लवादाकडेच पाठवावा लागेल.

18. निविदा एकास/अनेकास देणे किंवा विभागून देण्याचा अधिकार मा शिक्षण मंडळास आहे.

19. बालवाडी साहित्य आणि खेळणी सांगितलेल्या शाळेत पुरविल्यानंतर त्याची मा. शिक्षण मंडळाकडून पाहणी करण्यात येईल. पुरविलेले बालवाडी साहित्य आणि खेळणी विहित नमुन्यात आहेत किंवा नाहीत हे पाहिले जाईल खराब किंवा स्पेसिफिकेशनप्रमाणे नसलेले बालवाडी साहित्य आणि खेळणी कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.

20. मंजुर केलेले बालवाडी साहित्य आणि खेळणी स्पेसिफिकेशनप्रमाणे ठरवून दिलेल्या मुदतीत पुरवठा झाल्यानंतर पुरवठा केलेल्या बालवाडी साहित्य आणि खेळण्यांचे एकत्रित देयक मा. शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा. पुणे यांच्या नावे या कार्यालयात सादर करावे लागेल. शाळावार बालवाडी साहित्य आणि खेळणी पुरवठा करताना प्राप्त केलेली चलने संबधित शाळेच्या मा. मुख्याध्यापकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्यासह देयकासमवेत सादर करावी लागतील. व पुणे मनपाकडील जकात विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत बिल देण्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

21. निविदा दिनांक 18/02/2011 रोजी दुपारी 3 वाजता किंवा मा.शिक्षण मंडळाचे सोईनुसार उघडण्यात येतील. वेळी व त्याप्रसंगी ठेकेदार स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रशासकीय कारणास्तव त्या दिवशी निविदा न उघडलयास निविदा उघडण्याचा नवीन दिनांक सहभागी निविदादारास दूरध्वनी वरुन कळविण्यात येईल. वेळी व त्याप्रसंगी निविदादारास हजर रहावे लागेल त्याकामी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

पुणे.

दिनांकः–

| | |
|---|---|
| **स्वाक्षरी/–** | **स्वाक्षरी/–** |
| **अध्यक्ष** | **शिक्षण प्रमुख,** |
| **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा** | **शिक्षण मंडळ,पुणे म.न.पा** |

# प्रतिज्ञालेख

मी,श्री.————————————————————————————वय ——— व्यवसाय – धंदा, राहणार ———————————————————————————————— निविदादार सत्य प्रतिज्ञेवर कथन करीतो की,व रील निविदा, फॉर्मसोबतच्या अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचल्या असून त्या सर्व मला व माझ्या संस्थेला मान्य आहेत. त्यानुसारच निविदा भरलेली आहे व निविदा सोबतच्या अटी व शर्ती मला मान्य आहेत. म्हणून सदर प्रतिज्ञापत्रावर आज रोजी पुणे येथे सही करुन निवीदा सोबत दाखल करित आहे.

**पुणेः–**

**दिनांकः–**

**पुरवठादार सही व शिक्का**